महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

कृषी विद्यान संकुल, काष्टी

KVS NEWS

# कृषि विज्ञान संकुल येथे जागतिक रक्तदाता दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

कृषि विज्ञान संकुल, मालेगाव अंतर्गत कृषि महाविद्यालय, कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय, कृषि अभियांत्रिकी व तंत्रद्यान महाविद्यालय, अन्नतंत्रद्यान महाविद्यालय, कृषि तंत्रनिकेतन व सेवा ब्लड बँक, मालेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत स्वातंत्र्याचा अमृत मोहोत्सव व जागतिक रक्तदाता दिनानिमित्त १४ जून, २०२३ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करून मोठ्या संख्येने विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदविला.

कृषि विज्ञान संकुला अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सोमनाथ सोनवणे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्व यांवर मार्गदर्शन केले. विद्यार्थी कल्याण अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय पाटील यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली. अन्न तंत्रद्यान महाविद्यालयाचे प्रकल्प अधिकारी डॉ. थोरात, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रकल्प अधिकारी डॉ. कानवडे, उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्रकल्प अधिकारी डॉ. बिरारी, कुलमंत्री डॉ. भगवान देशमुख या सर्वांनी शिबिरास उपस्थिती नोंदविली.

यावेळी सेवा ब्लड बँक, मालेगावचे संस्थापक श्री. पुष्पक पगार यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले व जास्तीत जास्त रक्तदान करण्याचे आवाहन केले. या शिबिरामध्ये 75 पेक्षा जास्त विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून उत्साहाने प्रतिसाद दिला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शिबिर यशस्वी होण्यासाठी मदत केली. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, डॉ. तापकिर, डॉ. गोडसे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तसेच प्रा. श्वेता देवकर यांनी आभार प्रदर्शन केले.



# महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

# कृषी विद्यान संकुल, काष्टी

## KVS NEWS

